# !!प्रेस नोट!!

दिनांक २०/०६/२०२६

## “ पोलीस उप आयुक्त पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई कार्यालयातंर्गत असलेल्या पोलीस ठाणेनी, ४४० तक्रारदारांचा ३ कोटी २६ लाख, २३ हजार ९४७ रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून तक्रारदार यांना परत केलेबाबत.”

पोलीस उप आयुक्त पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई कार्यालयांतर्गत अंधेरी, एमआयडीसी, मेघवाडी, जोगेश्वरी, साकीनाका, पवई पोलीस ठाणेमधील चोरी/गहाळ/फसवणुक झालेला तसेच सायबर गुन्हयात फ्रिज करण्यात आलेला मुद्देमाल तक्रारदार यांना ऑडीटोरीअम हॉल, सेव्हन हिल हॉस्पीटल, मरोळ मरोशी रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई ४०००५९ येथे दिनांक २०/०६/२०२६ रोजी सायंकाळी १६:०० ते १८:०० वा या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या मुदृदेमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान परत देण्यात आला.

पोलीस उप आयुक्त पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई हद्दीतील पोलीस ठाणेतील चोरी/गहाळ/फसवणुक/सायबर गुन्हयातील मालमत्ता हस्तगत करण्यासाठी परिमंडळीय पोलीस ठाणेतील अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम करून मुद्देमाल हस्तांतर कार्यक्रमामध्ये पोलीसांनी आज रोजी फिर्यादी/तक्रारदार यांचा चोरीस/गहाळ/फसवणुक तसेच सायबर गुन्हयात फ्रिज केलेली एकुण ४४० तक्रारदार यांची एकुण ३ कोटी २६ लाख, २३ हजार ९४७ रूपये इतक्या किंमतीचा मुद्देमाल फिर्यादी यांना सन्मानपूर्वक परत करून त्यांचा आनंद व्दिगुनीत केला.

**हस्तांतरण /परत केलेल्या मुद्देमालाचा तपशील :**

| तपशील | संख्या | वजन | किंमत |
|---|---|---|---|
| मोल्यवान वस्तु व दागिने | १९ | ८५२ ग्रॅम वजनाचे सोने व चांदीचे दागिने | १,३५,०७,७५० |
| रोख रक्कम | १० | ० | १०,७५,२३० |
| दुचाकी वाहने | १७ | ० | २१,९५,००० |
| तिनचाकी वाहने | ५ | ० | ५,९५,००० |
| चारचाकी वाहने | ३ | ० | ३७,००,००० |
| मोबाईल फोन | ३७१ | ० | ४०,६४,७०० |
| सायबर फसवणूक | ६ | ० | १०,८९,९११ |
| इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु | ९ | ० | ६३,९६,३५६ |
| एकूण | ४४० | ८५२ ग्रॅम वजनाचे सोने व चांदीचे दागिने | ३,२६,२३,९४७ |

मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमामध्ये हजर असलेल्या ४४० फिर्यादी/तक्रारदार यांना आपल्या कष्टाचा मुद्देमाल परत मिळाल्याने बऱ्याच फिर्यादींनी पोलीसांनी केलेल्या कामाचे कौतुक करून मुंबई पोलीस हे नेहमी चांगल्या पध्दतीने आपले कर्तव्य बजावुन चोख भुमिका पार पाडतात अशा शब्दात मनोगत व्यक्त करून बृहन्मुंबई पोलीस दलाचे आभार मानले.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त बृहन्मुंबई श्री देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) डॉ. श्री. मनोजकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग डॉ.श्री. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, श्री दत्ता नलावडे, परिमंडळ १०, मुंबई, सहायक पोलीस आयुक्त, श्री गजानन पवार, अंधेरी विभाग, मुंबई, अतिरिक्त कार्यभार मेघवाडी विभाग, मुंबई व सहायक पोलीस आयुक्त, श्री. प्रदिप मैराळे, साकीनाका विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि श्री उमेश मचिंदर, अंधेरी पोलीस ठाणे, व.पो.नि श्री रविंद्र वाणी, एमआयडीसी पोलीस ठाणे, व.पो.नि श्री सुधाकर हुंबे, मेघवाडी पोलीस ठाणे, व.पो.नि श्री इक्बाल शिकलगार, जोगेश्वरी पोलीस ठाणे, प्र.व.पो.नि सपना क्षीरसागर, साकीनाका पोलीस ठाणे व व.पो.नि श्री जितेंद्र सोनवणे, पवई पोलीस ठाणे, तसेच सर्व पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक प्रशासन यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली पश्चिम परिमंडळ ०३,मुंबई मधील सर्व पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.